**प्रकल्प प्रवर्तक वे.को.लि. चंद्रपूर क्षेत्र, ता. जि. चंद्रपूर यांनी त्यांच्या प्रस्तावित वाढीव उत्पादनाकरिता मे. वे.को.लि. भटाडी (विस्तार) खुली खाण प्रकल्प पो. पायली, भटाडी, ता. जि. चंद्रपूर येथे ८४७.३७ हेक्टर क्षेत्रात वाढीव उत्पादन क्षमता ०.९७५ दशलक्ष टन प्रती वर्ष ते १.४६५ दशलक्ष टन प्रती वर्ष प्रकल्पासाठी पर्यारणविषयक जाहिर सुनावणीचे इतिवृत्त**

**दिनांक : १३/०९/२०१९**
**वेळ : सकाळी ११.०० वाजता**
**स्थळ : वे.को.लि. दुर्गापूर सभागृह, दुर्गापूर, ता. जि. चंद्रपूर**

**प्रस्तावनाः-**

मे. वे.को.लि. चंद्रपूर क्षेत्र, ता. जि. चंद्रपूर यांनी त्यांच्या प्रस्तावित वाढीव उत्पादनाकरिता मे. वे.को.लि. भटाडी विस्तार खुली खाण प्रकल्प पो. पायली, भटाडी, ता. जि. चंद्रपूर येथे ८४७.३७ हेक्टर क्षेत्रात वाढीव उत्पादन क्षमता ०.९७५ दशलक्ष टन प्रती वर्ष ते १.४६५ दशलक्ष टन प्रती वर्ष या प्रकल्पाबाबत प्रकल्पधारकाने पर्यावरण मंजूरीकरिता पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अर्ज सादर केल्यानंतर, थर्मल आणि कोळसा खाण प्रकल्प मंत्रालय, नवी दिल्ली यांचाप्रकल्पाकरिताच्या पर्यावरण मुल्यांकन तज्ञ समिती (EAC) यांनी त्यांच्या दि. १७.०४.२०१८, ३१.०८.२०१८ व दि. २४.०१.२०१९ रोजी झालेल्या २८वी, ३६वी व ४२वी बैठकीमध्ये सदर प्रस्तावीत प्रकल्पास पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ च्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत जाहीर जनसुनावणीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे व त्याबाबत प्रकल्पधारकाने दिलेली उत्तरे यांचा सामावेश करून नवीन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर करण्याचे दिले होते (सहपत्र-१).

प्रकल्प व्यवस्थापनाने पर्यावरण विषयक जनसुनावणीसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे उपरोक्त प्रकल्पाकरीता अर्ज केल्यावर मप्रनि मंडळ, चंद्रपूर यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने दि. १३/०९/२०१९ ही तारीख निश्चित करण्यात आली. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदी प्रमाणे सदर जनसुनावणीची जाहीर सुचना, मप्रनि मंडळाने दि. १०.०८.२०१९ रोजीच्या मराठी दैनिक"लोकसत्ता" व "देशोन्नती" व इंग्रजी दैनिक "द हितवाद" मध्ये प्रसिध्द केली. वृत्तपत्रातील जाहीर सुचनेच्या जाहिरातीद्वारे सर्व संबंधित व्यक्तींना त्यांच्या सुचना, टीकाटिप्पणी, विचार, आक्षेप इत्यादी संबंधित नियामक प्राधिकरण येथे नोंदविण्याबाबत आवाहन करण्यात आले होते.

या प्रकल्पाबाबत प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशाची इंग्रजी व मराठी प्रत खालील कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनाकरीता/संबंधितांच्या अभ्याासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

१) पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२) सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
४) उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५) जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
६) जिल्हा परिषद, चंद्रपूर.
७) जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
८) उप-विभागीय कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
९) तहसिल कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
१०) तहसिल कार्यालय, भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
११) पंचायत समिती कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
१२) पंचायत समिती कार्यालय, भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर
१३) गट-ग्रामपंचायत कार्यालय, पायली-भटाळी, ता. जि. चंद्रपूर.
१४) गट-ग्रामपंचायत कार्यालय, विचोडा (चांदसुर्ला), ता. जि. चंद्रपूर.
१५) ग्रामपंचायत कार्यालय, चेक तिरवंजा (क.), ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
१६) गट-ग्रामपंचायत कार्यालय, पद्मापूर, (किटाळी), ता. जि. चंद्रपूर
१७) गट-ग्रामपंचायत कार्यालय, तिरवंजा (मोकासा), ता. भद्रावती, जि. चंद्रपूर

वरील अनुक्रमांक ५ ते १७ वर नमूद शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर या जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिद्धी देण्याबाबत कळविण्यात आले होते. अशा तऱ्हेने जाहीर जनसुनावणी बाबत अधिसूचनेमध्ये मध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरूपात प्रसिध्दी देण्यात आली जेणेकरुन प्रकल्प बाधित अथवा संबंधित व्यक्तीना त्यांचे आक्षेप, टिका टिप्पणी, विचार अथवा सुचना संबंधित नियामक प्राधिकरणास नोंदविणे सोईचे होईल.

जनसुनावणीचे स्थळ वे.को.लि. दुर्गापूर सभागृह, दुर्गापूर, ता. जि. चंद्रपूर निवडण्यात आले कारण हे स्थळ प्रकल्पाजवळचे असुन संबंधितांना सोईस्कर असल्याने या ठिकाणी जनसुनावणी ठेवण्यात आली.

पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. १४/०९/२००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी खालीलप्रमाणे समिती मंडळाचे पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-३२०७ (कार्यालयीन आदेश क्र. E-६१ चा २०१९) दि. २९/०८/२०१९ च्यानुसार गठीत केली.

१) जिल्हा दंडाधिकारी, चंद्रपूर - **अध्यक्ष,**
किंवा त्यांचे प्रतिनिधी कमीतकमी अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, पदाचे

२) प्रादेशिक अधिकारी, - **सदस्य**
मप्रनि मंडळ, चंद्रपूर

३) उप प्रादेशिक अधिकारी, - **समन्वयक**
मप्रनि मंडळ, चंद्रपूर

सदर प्रकल्पाबात प्राप्त झालेल्या तक्रारी, आक्षेप, निवेदन, प्रश्न प्राप्त झाले नाही व जनसुनावणी दरम्यान एकूण उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी गठीत केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ प्रमाणे सोबत जोडलेले आहे.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरुवातीस श्री. अजित पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी अध्यक्ष व उपस्थित अभ्यगतांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहीती दिली. त्यांनी उपस्थितांना पर्यावरण विषयक, सुचना, विचार, आक्षेप इत्यादी घेऊन पुढे यावे अशी विनंती केली. तसेच त्यांनी हि सुनावणी सर्व संबंधित लोकांसाठी आयोजीत केलेली आहे जेणेकरुन त्यांचे पर्यावरण विषयक प्रश्न/शंकाचे निरसन करण्यात येईल. तद्नंतर त्यांनी जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांना जनसुनावणीची कार्यवाही सुरु करण्याबाबत विनंती केली.

जनसुनावणी समितीचे अध्यक्ष तथा निवासी जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी उपस्थित जनसमुदायास मे. वे.को.लि. चंद्रपूर क्षेत्र, ता. जि. चंद्रपूर यांनी त्यांच्या प्रस्तावित वाढीव उत्पादनाकरिता मे. वे.को.लि. भटाडी विस्तार खुली खाण प्रकल्प पो. पायली, भटाडी, ता. जि. चंद्रपूर येथे ८४७.३७ हेक्टर क्षेत्रात वाढीव उत्पादन क्षमता ०.९७५ दशलक्ष टन प्रती वर्ष ते १.४६५ दशलक्ष टन प्रती वर्ष या प्रस्तावाबाबत प्रस्तावाबाबत आपल्या सुचना, विचार,आक्षेप घेऊन पुढे यावे अथवा त्या लेखी स्वरुपात मांडाव्यात, आपण व्यक्त केलेले मत तसेच सुचना व आक्षेप या अधिसूचनेत नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना कळविण्यात येतील, सदर सुनावणीचे छायाचित्रीकरण व व्हिडीओ शुटींग म.प्र.नि.मंडळाकडुन कायद्यातील तरतुदी प्रमाणे करण्यात येत आहे, तरी प्रत्येकाने आपले प्रश्न शांतपणे व सनदशिर मार्गाने उपस्थित करावेत व जन सुनावणी शांतपणे पार पाडण्यात सहकार्य करावे असे आवाहन केले. तसेच प्रत्येकाने आपले प्रश्न विचारण्यापुर्वी आपले नाव व पत्ता सांगावा जेणे करुन सुनावणीच्या इतिवृत्तांत तयार करते वेळी नमुद करण्यात येईल. त्यानंतर त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहीती उपस्थितांना देण्यात यावी तसेच त्यांनी प्रकल्पाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांचे शंकानिरसन करावे अशी विनंती केली.

तद्नंतर प्रकल्पधारकाच्या वतीने श्री.राजेंद्र हरडे, पर्यावरण सल्लागार, सेंट्रल माइन प्लानिंग अँड डिजाइन इंस्टीट्युट लिमिटेड, नागपूर यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक केलेला अहवाल मराठी भाषेत सादर केला. सादरीकरणात प्रामुख्याने प्रकल्पाबाबत खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहीती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, सिमा, अक्षाश-रेखांश, नकाशा, बुडीत क्षेत्र, लाभ क्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्टय, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भुकंप स्थिरता
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांचा प्रकल्पामुळे होणारा विकास
- प्रकल्पाचे विश्लेषण,सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषन
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इत्यादी बाबतची माहीती.
- नियोजीत प्रकल्पांमुळे हवा, पाणी, विस्थापन, जैवविविधता यावर होणारे परिणाम व्यवस्थापन.
- प्रकल्प चालु झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहीती.
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहीती.

प्रकल्पधारकाने पर्यावरण विषयीची सविस्तर माहीती दिल्यानंतर सुनावणीचे आयोजक यांनी असे आवाहन केले की, यानंतर आक्षेप/सुचना/प्रश्न व उत्तरे घेतले जातील. आपणांस विनंती की, सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत व त्यांचे समर्पक उत्तर प्रकल्प धारकाने द्यावे.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पण्या, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे:**

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने/जरसुनावणी समिती |
|---|---|---|
| १. | **श्री. मिलिंद पंढरी काटकर, रा. तिरवंजा मोकासा, त. भद्रावती जि. चंद्रपूर**<br>अ) माझी जमीन वे.को.लि. ने सन १९९० मध्ये अधिग्रहीत केली त्यातील उर्वरीत २५ टक्के जमीन ज्यात वे.को.लि. च्या डंपीगची धुळ व पाणी माझ्या शेतात गेल्यामुळे शेताच्या पिकाच नुकसान होत आहे व त्याच्याकडे वे.को.लि. सातत्याने दुर्लक्ष करत आहे.<br>आ) वाढीव जमिनीच्या मोबदला देण्यात आलेला नाही. | अ) १९९० मध्ये यांची ४.५५ हेक्टर जमीन अधिग्रहीत केली गेली आहे व त्या बदल्यात २ नोकऱ्या व जमिनीचा मोबदला पण देण्यात आलेला आहे. त्यांनी त्यावेळी कुठलाही प्रश्न उपस्थित केलेला नाही.<br><br>आ) यांनी हा पश्न १९९० मध्ये यांची जमीन संपादीत करतेवेळी उपस्थित न करता २००२ मध्ये उपस्थित केलेला आहे. त्यांना या बद्दल काही आक्षेप असल्यास ते स्पेशल ट्रिब्युनल कोर्टात जाऊ शकतात व कोर्टाचा जो निर्णय राहील तो वे.को.लि. ला मान्य राहील. |

| | | |
|---|---|---|
| २ | **श्री. सोनु आगाशे, रा. भटाळी, त. व जि. चंद्रपूर**<br>अ) सन २०१६ मध्ये ११०० एकर जमीन संपादीत केली त्यावेळेस ५ टक्के उर्वरीत जमीन ती का संपादित करण्यात आली नाही. ५ टक्के उर्वरीत जमिनीवर शेती व्यवस्थित करु शकत नाही कारण प्रदूषण वाढलेले आहे. त्यामुळे उर्वरीत ५ टक्के जमीन सुध्दा अधिग्रहीत करण्यात यावी.<br>आ) उर्वरीत ५ टक्के जमीन केव्हा पर्यंत घेण्यात येईल व पहीले पुनर्वसन करावे व नंतर वाढीव उत्पादन करावे. | अ) जमीन कमीत कमी घेऊन उत्पादन करणे आवश्यक आहे पुढच्या वाढीव उत्पादनाच्या वेळेस उर्वरीत जमीन संपादित करणे विचाराधीन राहील.<br>आ) ग्रामपंचायतद्वारा जो पर्यंत पारित ठराव देण्यात येत नाही व पुनर्वसनाची जागा सुनिश्चित करण्यात येत नाही तो पर्यंत पुनर्वसन प्रक्रिया पुर्ण होऊ शकत नाही. |
| ३ | **श्री. मोहन तुरांकर, माजी ग्रामपंचायत सदस्य, पायली-भटाळी, त. जि. चंद्रपूर**<br>अ) शेती घेतली त्यावेळी ७/१२ चे पैसे दिले पण भेगवाटदार २ चे पैसे देण्यात नाही आले. | अ) भोगवाटदार २ चे भोगवाटदार १ करण्याचे कार्य सुरु आहे. ही प्रक्रिया वे.को.लि. तर्फे करण्यात येत आहे. |
| ४ | **श्री. नारायण बुध्दाजी रायपुरी, रा. पायली-भटाळी, वार्ड क्र. त. जि. चंद्रपूर**<br>अ) पायली भटाळी वार्ड क्र. २ मध्ये प्रदूषण वाढले आहे. रात्रीच्या वेळी जनावर घरात येतात व घरा जवळ दुर्गंधी पसरलेली आहे. ब्लास्टिंगमुळे घरापर्यंत दगड येऊन राहीले आहेत. जमिनीचे पैसे दण्यात यावे व नंतर पुनर्वसन करण्यात यावे. | अ) पुनर्वसनाचे स्थळ प्रथम निश्चित करण्यात यावे. वे.को.लि. पुनर्वसन करुन देण्यास तयार आहे. |
| ५ | **श्री. चंदु सातपुते, रा. भटाळी, त. जि. चंद्रपूर**<br>अ) भटाळी खुली खाणमुळे शेतीत काम करणारे मुले बेरोजगार झालेले आहेत त्यांना काम देण्यात यावे, कंत्राटी पध्दतीवर नोकरी देण्यात यावी, सुशिक्षित वर्गाला निविदा देण्यात याव्या व पुनर्वसन करण्यात यावे. ब्लास्टिंगमुळे घराला तळे जातात त्यावर उपाय योजना करण्यात यावी, पुनर्वसनाची जागा कळविण्यात यावी. | अ) ३५९ प्रकल्पबाधितांना नोकऱ्या देण्यात आल्या व मोबदला देण्यात आलेले आहेत. स्थानिक प्रबंधकाद्वारे प्रकल्प ग्रस्त लोकांना प्रशिक्षण देऊन त्यांना खाजगी कंत्राटदारकडे नोकरी देण्यात येते. पेटी कंत्राटीची योजना करण्यात आली आहे. भटाळी पुनर्वसनासाठी वे.को.लि. कठीबध्द आहे. उद्योग व तुमच्यामध्ये समझोता करण्यात येईल व पुनर्वसन ची जागा आताच सांगणे शक्य नाही. |

| | | |
|---|---|---|
| ६ | **श्री. मधुकर लाड, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर** | |
| | अ) नाला वळवण्याची संबधीत विभागा कडुन परवानगी घेण्यात आली का? | अ) इरई नदीचे वळणीकरण पाटबंधारे विभाग, महाराष्ट्र शासन च्या सेंट्रल डिझाईन ऑर्गनाईझेशन, नाशिक, यांच्याकडून परवानगी घेऊन करण्यात येईन. |
| | आ) प्रदूषणावर आळा घलण्यासाठी कोणता प्रस्ताव आहेत. | आ) सद्या पाण्याच्या टँकर व स्थिर सयंत्र फवारणीसाठी यंत्रणा कोळसा हाताळणी प्रकल्पात कार्यान्वित आहेत, जेणे करुन धुळीवर नियंत्रण करता येते. कोळसा वाहतुक रस्त्यावर यांत्रिकी पध्दतीने धुळ साफ करण्यात येईल, जेणे करुन धुळीवर नियंत्रण करता येते. भटाळी खुली खाण परिसरात कोळसा वाहतुकीसाठी पाईप कन्वेयर सयंत्राची निर्मीती सुरु आहे व भविष्यात कोळसा वाहतुक ट्रक द्वारे बंद करण्यात येईल. |
| ७ | **श्री. उमाशंकर भादुले, क्षेत्र अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर** | |
| | अ) उत्पादन करते वेळे जो काही कोळसा निघेल त्या राखेच प्रमाण किती राहील? | अ) केंद्रीय खाण व इंधन संशोधन संस्था (CIMFR) च्या प्रयोगशाळा पृथःकरण अहवाला नुसार राखेचे प्रमाण सद्यास्थितीत २४ टक्के आहे. |
| | आ) ब्लास्टिंग मुळे दगड का उडतात? | आ) खाण सुरक्षा महानिर्देशक द्वारा नमूद केलेल्या परवानगी नुसार आम्ही ब्लास्टिंग चे कार्य करतो आणि दगड उडु नये यासाठी नियंत्रीत ब्लास्टिंग करण्यात येते व त्यामध्ये शॉक ट्युबचा वापर करण्यात येतो. सद्यास्थितीत उत्खनाचे काम सुरु आहे तिथुन गावाचे अंतर ९०० मीटर दुर आहे. त्यामुळे ब्लास्टिंगचे दगड गावात जाण्याचा प्रश्न उद्भवत नाही. |
| | ई) भटाळी खुली खाणसाठी सतत वातवरणीय हवेची गुणवत्ता तपासणी सयंत्रणा (CAAQMS) ची सद्यास्थिती काय आहे? | ई) एक सतत वातवरणीय हवेची गुणवत्ता तपासणी सयंत्रणा (CAAQMS) सद्यास्थितीमध्ये दुर्गापूर खुली खाणमध्ये क्लस्टर आधारावर वे.को.लि. चंद्रपूर क्षेत्रासाठी बसविण्याचे काम सुरु आहे. गरज पडल्यास भटाळी खुली खाणसाठी सतत वातवरणीय हवेची गुणवत्ता तपासणी सयंत्रणा चा विचार करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ८ | **श्री. बंडु शंकर सोनटक्के, रा. भटाळी, त. जि. चंद्रपूर**<br>अ) वे.को.लि. चे अधिकारी ब्लास्टिंगवर चर्चा करतात व नेहमी खोटे बोलतात. श्री. शंकर माहसकोल्हे च्या घरापासुन ते ब्लास्टिंग ठिकाणा पर्यंतचे अंतर मोजण्यात यावे.<br>आ) प्रकल्पग्रस्त किंवा स्थानिक लोकांना रोजगार देण्यात यावे. | अ) खाण सुरक्षा महानिर्देशक यांच्या परवानगी नुसार ब्लास्टिंगचे कार्य केले जाते<br><br>आ) वे.को.लि. च्या नियमानुसार प्रकल्पग्रस्थांना जमीनीचा मोबदला व नोकऱ्या देण्यात येतात. सिपेट (CIPET) द्वारे प्रशिक्षणाची सोय केली गेली आहे व त्या अंतर्गत बरेच लोकांना रोजगार मिळाले आहेत. तसेच महाराष्ट्र स्वरोजगार विकास क्रेंद (MCED) द्वारा इलेक्ट्रीशन, फॅशन डिझाईनिंग व ब्युटी पार्लर चे प्रशिक्षण वे.को.लि. च्या सैजन्याने गावकऱ्यांना देण्यात आले. याचा लाभ गावातल्या लोकांना मिळालेला आहे. |
| ९ | **श्री. बंडु नामदेव लोहाट, रा. किटाळी, त. जि. चंद्रपूर**<br>अ) वे.को.लि. द्वारा ट्रकची वाहतुकसाठी पुल बांधण्यात आल्यामुळे किटाळी गावात पाणी येत आहे. नदीचे पात्र कमी होत आहे व इरई नदीचे पाणी गावात येत आहे.<br>आ) पावसाळ्याच्या आधि पुल हटवण्यात आला का? | अ) वे.को.लि. कोळसा वाहतुकीसाठी शासनाकडुन परवानगी घेऊन तात्पुरता पुल बांधला होता.<br><br>आ) पावसाळ्यापुर्वी पुल हटविण्यात आला होता. |
| १० | **श्री. सुभाष गोरकार, माजी, पंचायतसमिती सदस्य, रा. भटाळी, त. जि. चंद्रपूर**<br>अ) वे.को.लि. मुळे प्रदूषण निर्माण होते. | अ) वे.को.लि. प्रदूषण नियंत्रणासाठी नियमितपणे कार्यवाही करते. |
| ११ | **श्री. प्रमोद सुरेश खिरवटकर, रा. भटाळी, त. जि. चंद्रपूर**<br>अ) भटाळी खुली खाणसाठी उर्वरीत 5 टक्के जमीन केव्हा संपादीत करणार?, ब्लास्टिंगमुळे होणारे घराचे नुकसानावर केव्हा उपाययोजन करण्यात येणार? व खराब रस्त्यांबाबत कारवाई केव्हा करण्यात येणार? | अ) या सर्व मुद्द्यांवर योग्य कार्यवाही केली जाईल व शासकीय यंत्रणेला कळविण्यात येईल. |
| १२ | **श्री. किशोर सुर्यभान ताजने, रा. भटाळी, त. जि. चंद्रपूर**<br>अ) अजुन पर्यंत नोकरी देण्यात आली नाही | अ) यांची जमीन भु-संपादन कायदा (LA, Act) नुसार संपादीत करण्यात आली व त्यावेळसच्या नियमानुसार ३ एकर पेक्षा कमी |

| | | |
|---|---|---|
| | | जमीन असल्यामुळे नोकरी देण्यात नाही आली. या संबंधीत आक्षेप असल्यास त्यांनी उच्चस्तरावर/न्यायालयात दाद मागावी. |
| १३ | **श्री. सुभाष गोरकार, माजी, पंचायतसमिती सदस्य, रा. भटाळी, त. जि. चंद्रपूर**<br>अ) भटाळी गावाचे पुनर्वसन होणे अत्यंत आवश्यक आहे. योग्य ठिकाणी पुनर्वसन करावे, 5 टक्के उर्वरीत जमीन लवकरात लवकर संपादीत करण्यात यावी व शेतकऱ्यांचे हित जपावे. | अ) आपल्या म्हणण्याची नोंद घेऊन वे.को.लि. द्वारा योग्य ती कार्यवाही करेल. |
| १४ | **श्री. महादेव पुंजाराम देवतळे, रा. भटाळी, त. जि. चंद्रपूर**<br>अ) शेतात जाण्यासाठी रस्ता नाही, त्यासाठी रस्ता करुन देण्या यावा. | अ) वे.को.लि. आश्वासन देते की, पावसाळा संपल्यावर रस्ता करुन देण्यात येईल. |
| १५ | **श्री. सागर श्रावन काटकर, रा. पायली-भटाळी, त. जि. चंद्रपूर**<br>अ) भटाळी या गावाचे पुनर्वसन करतांना पायली गावाचे देखील पुनर्वसन करण्यात यावे | अ) पायली गावाचे पुनर्वसन भविष्यात येणाऱ्या विस्तारीत/सुधारित प्रकल्प अहवालानुसार केले जाईल. |
| १६ | **श्री. राजकुमार रायपुरे, माजी सरपंच**<br>अ) पायली व भटाळी गावाचे पुनर्वसन एकत्रित करण्यात यावे. | अ) पायली गावाचे पुनर्वसन भविष्यात येणाऱ्या विस्तारीत/सुधारित प्रकल्प अहवालानुसार केले जाईल. |
| १७ | **श्री. विनोद महादेव थेरे, रा. किटाळी, त. जि. चंद्रपूर**<br>अ) पुनर्वसन करत्यावेळे घराचे मुल्यांकन हे सन २०११ च्या दरानुसार करण्यात येईल की, सन २०१९ च्या दरानुसार करण्यात येईल? | अ) पुनर्वसन करत्यावेळी घराचे मुल्यांकन हे सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन द्वारा करण्यात येते व ते सन २०११ च्या दरानुसार मुल्यांकन करण्यात येते व त्यावर १२ टक्के वृध्दी दर (Escalation) देण्यात येईल व ३० टक्के नुकसान भरपाई (Solatium) देण्यात येईल. |
| १८ | **सौ. सुनंदा संजय कुळमेथे, सरपंच, तिरवंजा मोकासा, त. भद्रावती, जि. चंद्रपूर**<br>अ) वे.को.लि. तर्फे गावात तलाव व तलावाचे सौंदर्यीकरण, 3 हात पंप, समाज भवन व विहीरी बनविण्यात आले. प्रती दिवशी नाले सफाई करण्यात येते व ३०० मीटर सिमेंट रोड करुन देण्यात आला. | अ) वे.को.लि. ने हे कार्य निगमित सामाजिक दायित्व (CSR) च्या अंतर्गत केलेली आहे व भविष्यात पण असे कार्य सुरु राहतील. |

| | | |
|---|---|---|
| १९ | **श्री. राजकुमार, सरपंच, तिरवंजा मोकासा, त. भद्रावती, जि. चंद्रपूर**<br>अ) भटाळी या गावाचे पुनर्वसन करतांना पायली गावाचे देखील पुनर्वसन करण्यात यावे | अ) पायली गावाचे पुनर्वसन भविष्यात येणाऱ्या विस्तारीत/सुधारित प्रकल्प अहवालानुसार केले जाईल. |
| २० | **श्रीमती कांचन गणपत आवळे, सरपंच, चक-तिरवंजा, त. भद्रावती, जि. चंद्रपूर**<br>अ) वे.को.लि.च्या अधिभार ढिगाऱ्याचा (Overburden) गाळ इरई नदीत जमा झाल्यामुळे पीण्याचे पाणी गढुळ येत आहे व गावकऱ्यांच्या आरोग्याला हानी होत आहे. त्यामुळे गावासाठी आर.ओ. प्लांट (R.O. plant) देण्यात यावा व गाव दत्तक घेतल्यामुळे गावातील पांदान रस्ता अधिभार टाकुन तयार करुन देण्यता यावा. | अ) आर.ओ. प्लांट लवकर देण्यात येईल व पाऊस थांबल्यानंतर पांदान रस्त्याचे काम करण्यात येईल. |
| २१ | **श्री. मनोज वाघमारे, चांदसुरला, त. जि. चंद्रपूर**<br>अ) वे.को.लि. च्या अधिभार ढिगाऱ्याचे पाणी शेतात आल्यामुळे पिकांचे नुकसान होत आहे. | अ) वे.को.लि. द्वारा पाहणी करुन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. |
| २२ | **श्री. सोनु आगाशे, रा. भटाळी, त. जि. चंद्रपूर**<br>अ) वे.को.लि. जेव्हा कोळसा वाहतुक करण्यासाठी रस्ता व तात्पुरता पुल बनवतात तेव्हा कोणाची परवानगी घेतात. | अ) वे.को.लि. द्वारे महाराष्ट्र शासनाकडुन परवानगी घेऊन कार्यवाही करण्यात येते. |
| २३ | **श्री. बाळकृष्ण पानघाटे, रा. चक-तिरवंजा, त. भद्रावती, जि. चंद्रपूर**<br>अ) शेतात गढुळ पाणी व गाळ आल्याने शेताचे नुकसान झाले, त्याची दीड वर्षा नंतर पाहणी करण्यात आली. | जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी अधिभार ढिगारे हे अधिकृत/नियोजित जागेवर करण्याचे वे.को.लि. यांना निर्देश दिले. |
| २४ | **श्री. प्रवीण उपरे, रा. भटाळी, त. जि. चंद्रपूर**<br>अ) माझ्या नोकरीचे काम श्री. कुडे साहेब व श्री. आभास चंद्रसिंगद्वारे करण्यात आले. त्यामुळे मी त्यांचे आभार मानतो. | अ) वे.को.लि. ने श्री. प्रवीण उपरे यांना नोकरी दिली आहे. |
| २५ | **श्री. विकास पेंढराम, रा. भटाळी, त. जि. चंद्रपूर**<br>अ) पुर्वी नवात बद्दल असल्यास कोर्ट स्टॅम पेपर वर लिहुन दिल्यास ते मान्य करत होते, परंतु आता कोर्ट आदेश (Decree) ची मागणी करण्यात येत आहे. | अ) नावामध्ये संशयास्पद तफावत आसल्यास कोर्ट आदेश (Decree) ची मागणी करण्यात येते अन्यथा नाही. |

| | | |
|---|---|---|
| २५ | **श्री. सतिश मारोती जुनघरे, रा. चक-तिरवंजा, त. भद्रावती, जि. चंद्रपूर**<br>अ) वे.को.लि. द्वारे पर्यावरणावर काय काय उपाययोजना करण्यात आल्या त्या सांगण्यात याव्या. | अ) प्रदूषण नियंत्रण योजनांची सखोल माहिती सादरीकरणामध्ये करण्यात आली आहे. पाण्याचे टँकर व स्थिर फवारणी सयंत्र यांचा वापर करुन धुळीवर नियंत्रण करण्यात येते. तसेच वृक्षारोपण करुन हरीत पट्ट्याची निर्मीत करण्यात आली आहे. वे.को.लि. द्वारे कोळसा वाहतुक रस्त्यावर यांत्रिकी पध्दतीने धुळ साफ करण्यासाठी सयंत्र घेतले आहे. भटाळी खुली खाण परिसरात कोळसा वाहतुकीसाठी पाईप कन्वेयर सयंत्राची निर्मीती सुरु आहे व भविष्यात कोळसा वाहतुक ट्रक द्वारे बंद करण्यात येईल. |

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समितीचेअध्यक्ष यांनी उपस्थित असलेल्या नागरीकांना आणखी काही प्रश्न/आक्षेप/सूचना असतील तर विचारण्याचे आव्हान केले. मात्र कोणीही तद्नंतर प्रश्न/सूचना/आक्षेप उपस्थित केले नाहीत व सांगितले की, बैठकीत करण्यात आलेल्या सूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात आली असून त्याचे ईतिवृत्त व रेकॉर्डींग जनतेकरिता प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, पहिला माळा, उद्योग भवन, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर येथे थोड्या दिवसात उपलब्ध करून देण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना जनसुनावणीतील उपस्थित झालेल्याबाबींचा आढावा घेऊन उपस्थितांचे आभार मानून जाहीर जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **(अजित पाटील)**<br>समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, चंद्रपूर | **(मधुकर लाड)**<br>सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, चंद्रपूर | **(घनश्याम भुगावकर)**<br>अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर |